PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 4, ISSUE 1

रा. ग. जाधव यांचे 'वाङ्.मयीन परिप्रेक्ष्य' : मराठी समीक्षेतील उपयुक्त परिणाम

प्रा. अतुलकुमार सारडे
जिजामाता कला महाविद्यालय,
दारव्हा जि. यवतमाळ.
महाराष्ट्र भारत

'वाङ्.मयीन प्ररिप्रेक्ष्य' हे प्रा. रा. ग. जाधव ह्यांचे मराठी समीक्षा प्रवाहातील अधिक एक महत्त्वाचे पुस्तक. मराठी साहित्य समीक्षा प्रांतात प्रा. रा. ग. जाधवांची ओळख 'सर्जनशील अभ्यासू समीक्षक' अशी आहे. औपचारिकता म्हणून ही ओळख येथे क्रमप्राप्त आहे. एरव्ही, समीक्षालेखणीतून प्रा. जाधवांनीच मराठी समीक्षेला नवीन परिमाणे आणि नवा आयाम प्राप्त करून दिलेला आहे.

उपरिनिर्दिष्ट पुस्तक विविध चर्चासत्रांमध्ये वाचलेले लेख अथवा भाषण एकत्र करून त्या समीक्षालेखाचे एक पुस्तक मराठीतील अभ्यासकांना प्राप्त करून देण्याच्या हेतूने प्रकाशित केलेले आहे. प्रस्तुत पुस्तक स्वरूप प्रकाशन औरंगाबाद ह्यांनी प्रकाशित केलेले आहे. सौ. उषा मुलाटे, प्रकाशक आणि डॉ. वासुदेव मुलाटे, प्रसिद्ध साहित्यिक ह्यांनी ह्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी परिश्रम घेतलेले आहे. हे पुस्तक मार्च २००४ मध्ये (प्रथमावृत्ती) प्रकाशित झाले आहे. पुस्तकाची पृष्ठसंख्या १४२ एवढी आहे. मुखपृष्ठ आकर्षक असून मलपृष्ठावरील अभिप्राय पुस्तकाचे साररूप स्पष्ट करते. पुस्तकाची बांधणी आणि लेखनाचा टाईप चांगला आहे, हे सांगणे येथे क्रमप्राप्त आहे.

'वाङ्.मयीन प्ररिप्रेक्ष्य' ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेतून डॉ. रा. ग. जाधवांनी आपले लेखन 'मराठी साहित्य - समीक्षेच्या अभ्यासकांना' सादर केले आहे. आपले समीक्षाक्षेत्राशी असलेले नाते पुस्तकाद्वारे अभ्यासकांशी घट्ट व्हावे, असा त्यांचा आग्रह आहे. एकूण नऊ प्रकरणांद्वारे प्रा. जाधव यांच्या वेगवेगळ्या विषयावरील समीक्षा विचारांचा आपल्याला परिचय प्रस्तुत पुस्तकातून घडतो. भारतीय साहित्याची संकल्पना, विसाव्या शतकातील उपयोजित मराठी समीक्षा, रुपसंकल्पना आणि मराठी साहित्य, आधुनिक मराठी कवितेतील प्रयोगशीलता : १८५० - २०००, मराठी स्त्रीवादी काव्याचे मूल्यमापन, गांधीवाद आणि आंबेडकरवाद, मराठी वाङ्.मयेतिहास - लेखनाचे स्वरूप, वैचारिक मराठी नियतकालिके : काही विचार ह्या लेखांतून प्रा. जाधव ह्यांच्या समीक्षाविचारांचा आढावा येतो. तथा, शेवटचे प्रकरण 'मराठी साहित्य समीक्षा आणि माझी पिढी' ह्यामधून प्रा. जाधवांच्या अभ्यासू समीक्षण कालाची जडणघडण व त्यांच्या सहृदय पिढीची त्यांची सोबत ह्याविषयी खुद्द जाधव प्रथमत:च मांडणी करतात, हे महत्त्वाचे.

'भारतीय साहित्याची संकल्पना' मांडताना भारतीय साहित्याची ओळख, राष्ट्रीय व विश्वसाहित्याचे प्रारूप, तौलनिक साहित्याची प्रेरणा व अभ्यास, पूर्वगामी भारतीयत्वाचा शोध, भारतीय साहित्याची जडणघडण ह्या मुद्द्यांद्वारे भारतीय साहित्य संकल्पनेची मांडणी केलेली आहे. भारतीय भाषांचा तत्कालीन व उत्तरकाळावरील प्रभाव, बदलती सर्जनशीलता, मध्ययुगीन भाषेच्या अभ्यासातून नव्या विचार कल्पनांचा व्यूह, इंग्रजीच्या प्रभावाने साहित्य प्रकारातील विविधता, जुन्या इतिहास- परंपरेचा अन्वयार्थ नव्या भारतीय भाषा साहित्य संकल्पनेशी लावण्याची गरज, नेमाड्यांचा देशीवाद, सानेगुरुजींची आंतरभारती विचारप्रणाली, रविंद्रनाथांचा विश्वसाहित्याविचार ह्या सर्व बाबींचा विचार भारतीय साहित्य संकल्पनेच्या जडणघडणीत महत्वाचा आहे. सोबतच, फुले आंबेडकर विचारसरणी लोकसाहित्याचा अभ्यास हेही त्याला पूरक आहे, असे जाधवांना वाटते.

'विसाव्या शतकातील उपयोजित मराठी समीक्षा' ह्या प्रकरणातून उपयोजित समीक्षेची व्याख्या व वर्गीकरण केलेले आहे. एका अभ्यासपूर्ण आलेखाद्वारे मराठी समीक्षेचा आढावा प्रा. जाधवांनी घेतलेला आहे. पूर्वसुरींचे प्रबंध, साहित्यकृतींचे समीक्षण, साक्षेपी संपादन, शैलीविज्ञान समीक्षा, पुस्तक परीक्षणे ह्याद्वारे एकोणीसाव्या शतकाचा विसाव्या शतकातील

समीक्षेसोबतचा अनुबंध स्पष्ट केलेला आहे. विसावे शतक - समीक्षेचे, त्यातील आस्वादक समीक्षावाद, जीवनसन्मुख नैतिकतावादी दृष्टिकोन ह्याचीही चर्चा येथे आली आहे. समीक्षेतील अंगभूत अंत:संघर्ष, समीक्षेकरिता साहित्य निवडीचा प्रश्न, पंथीय प्रणालीची अपुरी चिकित्सा, चांगल्या समीक्षेच्या अंतिम निकषाबाबत संभ्रम ह्याबाबत जाधवांनी शंका उपस्थित केल्या आहेत. शेवटी ते संपन्न साहित्याभिरूचीच्या संवर्धनाकरिता उपयोजित समीक्षा केली पाहिजे व हे कान वाड्.मयीन नियतकालिक, संस्था, शालेय मराठी अभ्यासक्रम, विद्यापीठ अभ्यासक्रम ह्यांनी करणे गरजेचे आहे, असे सूचवितात.

'रूपसंकल्पना आणि मराठी साहित्य' ह्या लेखातून प्रा. जाधवांनी साहित्याची अवस्था, रूपसिद्धी (रचना), कलेकरता कला, मर्ढेकरी लयतत्त्व व वाड्.मयीन महात्मतेचे रूपविवेचन, नेमाडेकृत रूपसंकल्पना ह्याची चर्चा केली आहे. साहित्याभासातील अभिरुचीची कच्ची बाजू, मर्ढेकर-नेमाडेंच्या रूपसंकल्पनेतील अपूर्णता, दृकश्राव्य माध्यमांचे प्रभावी आक्रमणाचे आव्हान इत्यादी विषयी जाधवांनी आपले परखड विचार मांडून साहित्याच्या रूपासंबंधी तात्विक व सौंदर्यशास्त्रीय मांडणीचा मानस व्यक्त केलेला आहे.

'आधुनिक मराठी कवितेतील प्रयोगशीलता' या सदराखाली सन १८५० ते २००० ह्या दीडशतकीय आधुनिक कवितेची रूपसिद्धी व रूपचर्चा केलेली आहे. चांगली मराठी कविता बाह्यांगिक कारणाने प्रयोगशीलते पासून का वंचित झाली आहे?, तिच्या प्रयोगशीलतेची वाट मोकळी करण्याची ऐतिहासिक गरज, मराठी कवितेचा सातशे वर्षाचा इतिहास तथा विषय पेलणारी समीक्षीय क्षमता, तरीही प्रयोगशीलतेचा अपुरा विचार ह्या सोबत प्रयोगशीलतेची समज ऐतिहासिक व तात्विक अंगासह कविलक्ष्यी अभ्यासाने वाढण्याची गरज, या संबंधात लघुअनियातकालिकांचे कार्य, प्रयोगशीलते संदर्भात त्यांची कल्पना-सूत्रे ह्या बाबीची चर्चा प्रा. जाधव करतात.

'मराठीतील स्त्री-वादी काव्याचे मूल्यमापन' ह्या लेखातून प्रा. जाधवांनी आपला स्त्रीवाद युरो अमेरिकन प्रभावाखालील असल्याचे मत व्यक्त केले आहे. स्त्रीवादाच्या बाजू, काव्यमाध्यमातून स्त्रीवादाचा अविष्कार, मराठी स्त्री काव्यातील शोषणाचे संदर्भ, स्त्रीकाव्याची भक्तिमार्गी परंपरा, विसाव्या शतकातील स्त्रीकाव्याची परंपरा, १९८० पूर्वीची परंपरा आणि

त्यातील स्त्रीव्यक्तिमूल्ये, पुरुषी प्रतीमानतेचे अनुकरण, पांढरपेशा मध्यमवर्गीय वर्गातील कवयित्री वर्ग त्यांची चर्चा आलेली आहे. १९८० नंतरच्या स्त्रीकाव्य परंपरेचा मागोवा आणि स्त्रीव्यक्तिमूल्यांतील पेच ओळखण्यातील यश, निषेधयुक्त स्त्रीकाव्य व मवाळपण, मानुषी मिथकदृष्टीचा वापर, चंगळवादाचा धोका ह्या बाबींची चर्चा करून अंतिम निरीक्षणाद्वारे आपले मूल्यमापन मांडले आहे.

'गांधीवाद आणि आंबेडकरवाद' ह्या शोध निबंधाद्वारे डॉ. जाधव ह्यांनी हे दोनही वाद कालोचित परिवर्तनाशी बांधित असल्याचे म्हटले आहे. इहवाद व अध्यात्मवाद या दोन्हींची सांगड, परंपरा व आधुनिकतेचा मेळ घालण्याची दोन्ही दर्शनांची आकांक्षा, परस्परांचे परिष्करण, नवी समाज संस्कृती रचना, दलित आत्मकथनांची प्रेरणा व म. गांधीजींचा आत्मसंघर्ष हा सर्वोत्तम संघर्ष, गांधीवादाची आधुनिकतेची चिकित्सक वाटचाल तथा आंबेडकर वादाची धम्माची चिकित्सक वाटचाल, परिवर्तन वाद्यांनी मूलधर्म, शोधण्याची गरज व सल्ला, 'हिंद स्वराज्य' गांधीवादी देशियतेचा जाहीरनामा, फुले, आंबेडकरवाद आणि गांधीवाद, गांधीवादी साहित्य सिद्धांत, ह्या विस्तृत विवेचनातून गांधीवाद व आंबेडकरवाद ह्यांचा अन्वयार्थ जोडण्याचा, प्रा. जाधवांचा प्रयत्न दिसून येतो.

'मराठी वाड्.मयेतिहास - लेखनाचे स्वरूप' या पाठातून साहित्येतिहासाचे पुनर्लेखन ही केवळ पूर्वकालीन प्रयत्नांची प्रतिक्रिया नाही, तर ती बदललेल्या सांस्कृतिक वाड्.मयीन पर्यावरणाची एक कालोचित गरज आहे, असे प्रा. जाधवांचे मत आहे. नव्या सांस्कृतिक वाड्.मयीन पर्यावरणाची जटील आव्हाने, वाड्.मयीन परंपरेचे सजीवीकरण, साहित्येतिहास व नवसर्जन, इतिहासाची अपरिहार्यता, प्रणालीय इतिहास लेखन, प्रभावांचा इतिहास, भाषांतरित साहित्येतिहासाची गरज, काही विषयांच्या वाड्.मयेतिहासाचे पुनर्लेखन या विषयांची चर्चा करून प्रा. जाधवांनी, साहित्यिकाप्रमाणे साहित्याचा इतिहासकार जन्माला यावा लागतो, असे म्हटले आहे. चांगल्या वाड्.मयेतिहासासोबत चांगले सिद्धांतन अटळपणे येतेच, हे सांगतांना प्रा. जाधव ह्यांनी, वाड्.मयेतिहास आपल्या कालखंडाची समग्र वाड्.मयीन समज देण्याचा प्रयत्न करतो, असे मत मांडले आहे.

'वैचारिक मराठी नियतकालिके : काही विचार' या लेखातून आधुनिकतेची जीवनमूल्ये व त्याचे आव्हाने, बौद्धिक आशय व प्रभावी गद्यशैली ह्यामुळे निर्माण झालेली वैचारिक मराठी नियतकालिक परंपरा, 'दिग्दर्शन' (१८४०) ते ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश पासून आजच्या समाज प्रबोधन पत्रिका, मौजे पर्यंतची १६० वर्षाची मराठी वैचारिक नियतकालिकांची दीर्घ परंपरा, मराठी वैचारिक स्वभावधर्माची मांडणी ह्यांचा प्रा. जाधव ह्यांनी पट मांडलेला आहे. 'नवभारत' चे संपादक आचार्य शंकरराव देव ह्यांचे मराठी वैचारिक नियतकालिकांच्या निकोप व तटस्थ दृष्टी संबंधीचे संपादकीय निवेदन, वैचारिक ध्येयवाद,नियतकालिकांच्या सूची निर्मितीचे कार्य व पुनःश्च गरज, सद्यस्थितीतील नियतकालिके - दिवाळी अंक ह्यांनी जपलेली विचारप्रधान परंपरा, विचारकलहांचे सुसंस्कृतपणे करावयाचे व्यवस्थापन म्हणजे वैचारिक नियतकालिके, बाजारुमूल्ये व व्यापारी दृष्टिकोन हे विवेकबुद्धीचे शत्रू, हेच आव्हान पेलणे, मानवतेचे कल्याण हा ध्येयवाद जपणे, ह्या सर्व बाबींचा परामर्श घेवून प्रा. जाधव वैचारिक मराठी नियतकालिकांचे पिंपळपान सळसळत राहण्याची अपेक्षा व्यक्त करतात.

'मराठी साहित्यसमीक्षा आणि माझी पिढी' या पाठातून प्रा. जाधव ह्यांनी प्रथमतःच आपल्या जडणघडणीवर भाष्य केले आहे. साठोत्तरी कालखंडाचा जिज्ञासू साहित्याभ्यासक म्हणून ओळख व्हावी, ही जाधवांची आकांक्षा होती. साहित्य, समाज-संस्कृती यांच्यातील आंतरिक दुवे व त्यांचे उद्‌बोधन भान माझ्या साहित्य निर्मिती निमित्ताच्या सहवासाने मला आणून दिले, असे जाधव सर सांगतात. मी व माझ्या पिढीने काय लिहिले, यापेक्षा आम्हाला वाड्.मयीन पर्वाचे साक्षीदार होता आले, हे मोलाचे ! हे जाधव यांचे विधान निश्चितच भूषणावह आहे. साहित्य-समीक्षा नाना दिशा, आकार-प्रकारांनी समृद्ध होताना लेखक व त्यांच्या पिढीच्या समीक्षावृत्ती उसळत राहिल्या व त्यातून सच्च्या साहित्य जिज्ञासूला लहान-थोर समीक्षक होण्यात भाग पाडते. मराठी साहित्यसमीक्षेने, सौंदर्य शास्त्राने लेखक व त्यांच्या सुहृद वर्गाला वाड्.मयीन दृष्टी व अभिरुचीची देणगी मिळाली. मात्र, एक खंत प्रा. जाधव व्यक्त करतात, दलित चळवळीच्या राजकीयीकरणात दलित साहित्याचा दीप नीटपणे तेवत ठेवण्यात अपयश आले, हे प्रांज्वळपणे नमूद करतात. साहित्य-समीक्षा सुसंस्कृत समाजाची गरज, त्याचे साक्षीदार, सहप्रवासी लेखक व त्यांची पिढी, ह्याबद्दल 'आमचे महद् भाग्य' असे म्हणतात.

साहित्याइतके भरवश्याचे साधन आजतरी कोणतेच नाही, असे मत व्यक्त करीत प्रा. जाधाव आपल्या पिढीतील विविध साहित्यिक, समीक्षक मंडळीचा, स्थळांचा उल्लेख करतात.

प्रा. रा.ग. जाधव ह्यांनी लिहिलेल्या 'वाड्.मयीन परिप्रेक्ष्य' या पुस्तकातील माझी काही निरिक्षणे ...

१. विविध चर्चासत्रातील सामिक्षालेखांचा अभ्यासकांना परिचय व्हावा, ह्याकरिता पुस्तक.
२. भारतीय साहित्य संकल्पनेचा नव्याने विचार व त्याच्या जडणघडण प्रक्रियेची ओळख.
३. संपन्न साहित्याभिरुचीकरिता - संवर्धनाकरिता उपयोजित मराठी समीक्षेची ओळख.
४. साहित्याच्या रूपासंबंधातील तात्विक व सौंदर्य शास्त्रीय मांडणीचा मानस.
५. आधुनिक मराठी कवितेतील प्रयोगशीलतेची कुंठलेली वाट मोकळी करणे.
६. मराठी स्त्रीवादी काव्य - त्यातील मवाळपण आणि अनुकरणशीलता, चंगळवादाचा धोका, ह्यांची जाणीव करून देण्याचा प्रयत्न.
७. गांधीवादी मूल्ये व आंबेडकरवादी परिवर्तन विचार ह्यांच्या अन्वयार्थातून नवसमाज, मूलधर्म, समाज संस्कृती रचन स्वीकारून कालोचित परिवर्तन साधणे.
८. मराठी वाड्.मयेतिहासाच्या पुनर्लेखनाची गरज समजावून सांगणे.
९. सुसंस्कृत समाज निर्मितीसाठी सुसंस्कृत वैचारिक नियतकालिकांची अत्यावश्यकता.
१०. साठोत्तरी कालखंडाचा जिज्ञासू साहित्याभ्यासक होण्याची सुप्ताकांक्षा.

संदर्भ :

'वाड्.मयीन परिप्रेक्ष्य' - रा. ग. जाधव : स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती, मार्च २००४